# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 06/11/2019 (बुधवार)
## (सकाळ)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत टेकाडी, ता. पारशिवनी येथे दिनांक 05/11/2019 चे 01:00 ते 01:45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– हंसराज बाजीराव राऊत, वय 46 वर्ष, रा. टेकाडी, पारशिवनी यांच्या घराचे दाराचे अज्ञात आरोपीने साखळी खोलुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादींच्या घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 53,000/–रू. व नगदी 6,000/–रू. असा एकुण कि. 59,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्री. जोसेफ हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत वाघोडा येथे दिनांक 22/10/2019 चे 15:00 ते दिनांक 05/11/2019 चे 10:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणेश महादेवराव जोगेकर, वय 53 वर्ष, रा. धवड लेआउट, काटोल हे मौजा वाघोडा खुटांबा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळाचे मुख्याध्यापक असुन शाळा बंद असतांना अज्ञात आरोपीने सदर शाळेची वर्ग 7 च्या खोलीचे कुलूप तोडून वर्गात प्रवेश केले. यानंतर आरोपीने वर्गात ठेवलेले कंपनीचे दोन जुने वापरते संगणक व एक डीव्हीडी प्लेअर असा एकुण 22,000/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. आकाश वरोकर हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत गोंडीदिग्रस येथे दिनांक 05/11/2019 चे 11:00 वा. ते 11:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीकांत बालदास काचेवार, रा. कलंभा हे संत्रा तोडीचे पैसे मागायला गेले असता आरोपी क्र. 1 श्रावण श्रीराम चौरे, रा. कलंभा व 2) रविन्द्र भगवान चौरे, रा. कलंभा यांनी फिर्यादी सोबत भांडण केले. यानंतर आरोपीतांने फिर्यादीला हातबुक्कीने व स्टीलच्या टिफीन बॉक्सने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राजेन्द्र वरोकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर